**नि.दि.मु.क्र.१६२/२०१३ मधील नि.१०३ वरील आदेश**
**CNR No. MHST16-000944-2013**
**(रामचंद्र आनंदराव डेरे वि. तानाजी आनंदराव डेरे वगैरे)**

प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज, त्याच्याविरुध्द नि.५७ लगत झालेला 'वादीचा उलटतपास नाही', चा आदेश सेट असाईड करुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादी तर्फे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुद्ध वाटप होवून मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादीने नि.५७ लगत पुराव्याचे शपथपत्र दिले असुन त्यावरील प्रतिवादीतर्फे उलटतपास प्रलंबित आहे. दरम्यानचे काळात प्रतिवादी मयत झाले. अशा परिस्थीतीत वारसांना हजर होवून त्यांची कैफियत देणेची होती. त्यानुसार त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली.

३. प्रतिवादी यांचे पुढील कथन असे आहे की प्रतिवादी यांना सदर प्रकरणातील सर्व माहीती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने नेमलेल्या तारखेस प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे प्रतिवादीचे विरुद्ध 'वादीचा उलटतपास नाहीचा' आदेश पारीत करण्यात आला. सदर प्रकरणात वादी यांनी त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांचे मयत वारस रेकॉर्डवर घेण्यास गेलेला अवधी व कोरोना काळ या सर्व गोष्टींमुळे प्रतिवादी यांना वादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे प्रतिवादी हे न्यायालयात हजर नसल्याने दिनांक २२.०२.२०२३ रोजी 'वादीचा उलटतपास नाहीचा' आदेश पारीत करण्यात आला. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीस उलटतपास घेण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. सबब 'वादीचा उलटतपास नाही', चा आदेश सेट असाईड होवुन वादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळावी, अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल केले असून प्रतिवादीनी अर्जात दिलेला मजकुर वादीने अमान्य केला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, वादी यांचे वय ८० वर्षे इतके झाले आहे. वादीने त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दिनांक ९.७.२०१५ रोजी दाखल केले आहे. कोरोना व वारसांचा मुद्दा हा अलीकडच्या काळातील आहे. प्रतिवादी हे हेतुपूर्वक दाव्याचे कामकाज लांबवत

आहेत. प्रतिवादी यांनी वेगवेगळी कारणे सांगून तारखा घेवून दाव्याचे कामकाज लांबविले आहे. त्यामूळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दिनांक ९.७.२०१५ रोजी वादीने वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. दिनांक १२.८.२०१५ रोजी प्रतिवादीचे विधीज्ञ हे गैरहजर असल्याने 'वादीचा उलटतपास नाहीचा' आदेश करण्यात आला होता. निशाणी ६३ वरील आदेशाप्रमाणे प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी देण्यात आली होती. सदरचा उलटतपास हा दिनांक १८.३.२०१९ रोजी प्रतिवादीचे विधीज्ञांचे तोंडी विनंतीवरुन तहकूब करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २२.२.२०२३ रोजी प्रतिवादी हे गैरहजर असल्याने त्यांचे विरुद्ध 'वादीचा उलटतपास नाही', चा आदेश करण्यात आला. दावा १० वर्षे जुना आहे. एकुण अभिलेख पाहता असे दिसुन येते की, प्रतिवादींच्या निष्काळजीपणामुळे वादीचा उलटतपास लांबलेला आहे. प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु यापुर्वी देखील प्रतिवादीना पुरेशी संधी देवुनही त्यांनी दावा चालविण्यात निष्काळजीपणा केला आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता प्रतिवादींना जास्त कॉस्ट करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

अर्ज नि.१०३ हा प्रतिवादीवर कॉस्ट र. रु. ३,०००/- (र. रु. तीन हजार फक्त) लादुन मंजूर करण्यात येतो. सदर कॉस्ट प्रतिवादीनी वादीस दयावी.

ठिकाण - वाई. (सी. व्ही. शिरसाट)

दिनांक - १७.०१.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.